शिक्षक उपसंचालक व तत्सम महाराष्ट्र शिक्षण सेवा (प्रशासन शाखा) गट-अ मधील अधिकाऱ्याची प्रशासकीय कारणास्तव बदलीबाबत-

महाराष्ट्र शासन
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग
शासन आदेश क्रमांकः बदली ३११७/प्र.क्र.१०९/प्रशा-२

मादाम कामा मार्ग,हुतात्मा राजगुरु चौक
मंत्रालय,मुंबई-४०००३२
तारीख: ५ मार्च, २०१८

<u>वाचा :</u> शालेय शिक्षण व क्रीडा विभाग अधिसूचना क्र. सप्रेनि-४५१६/प्र.क्र.११७/प्रशा-२, दिनांक १८.०१.२०१८

शासन आदेशः-

महाराष्ट्र शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे विनियमन आणि शासकीय कर्तव्य पार पाडताना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम, २००५ हा दि.१ जुलै, २००६ पासून अंमलात आला आहे. दिनांक १८.०१.२०१८ च्या सेवाप्रवेश नियमानुसार शिक्षण उपसंचालक व तत्सम (प्रशासन शाखा) या पदाचे सेवाप्रवेश नियम विहीत करण्यात आली आहेत. सदर सेवाप्रवेश नियमाच्या अनुसूची-अ मध्ये प्रशासकीय पदांचा समावेश करण्यात आला असून, अध्यापकीय स्वरुपाची पदे त्यामधून वगळण्यात आली आहेत. श्री. रविकांत देशपांडे हे अध्यापकीय पदावर कार्यरत असून त्यांची प्रशासनाच्या पदावर बदली करणे आवश्यक व असल्यामुळे सक्षम प्राधिकाऱ्यांच्या पूर्व मान्यतेने प्रशासकीय कारणास्त व त्यांच्या नावासमोर रकाना क्र. ४ मध्ये दर्शविलेल्या पदावर त्यांची बदलीने पदस्थापना करण्यात येत आहे.

अ.क्र.	अधिकाऱ्याचे नाव	सध्याचे कार्यरत ठिकाण	बदलीनंतरची पदस्थापना.	अभिप्राय
१	२	३	४	५
१	श्री. रविकांत देशपांडे	प्राचार्य, प्रादेशिक विद्या प्राधिकरण, नागपूर	विभागीय सचिव, म.रा.मा.व.उ.मा.शि.मडळ, नागपूर.	प्रशासकीय कारणास्तव सक्षम प्राधिकाऱ्यांच्या पूर्व मान्यतेने रिक्त पदावर

३. सदर अधिकाऱ्यानी त्यांच्या नवीन पदाचा पदभार त्वरित स्विकारावा तसेच त्यांनी अनधिकृत रजेवर जाऊ नये. त्यांचे लक्ष सामान्य प्रशासन विभागाच्या क्रमांक- सीडीआर १०८२/२५६७/ २८/ अकरा , दि. ३० ऑगस्ट १९९२ च्या परिपत्राकाकडे वेधण्यात येत आहे. त्यात दिलेल्या सूचना लक्षात घेऊन बदली रद्द करण्यासाठी कुठल्याही स्वरुपाची आवेदने सादर केल्यास, ते शिस्तभंगाच्या कारवाईस पात्र ठरतील याची संबंधितांनी नोंद घ्यावी.

४. आयुक्त (शिक्षण) महाराष्ट्र राज्य,पुणे यांनी या आदेशाप्रमाणे सदर अधिकाऱ्यांना त्यांच्या सध्याच्या पदभारातून तात्काळ कार्यमुक्त करण्याबाबत संबंधीत नियंत्रण अधिकाऱ्यांना तातडीने कळवावे व बदली झालेले अधिकारी विहित कालावधीत दिलेल्या पदस्थापनेच्या ठिकाणी रुजू होतील याची खातरजमा करावी व याबाबतचा अहवाल शासनास सादर करावा.

५. सदर आदेश बदली अधिनियम २००५ मध्ये नमूद कलम ४ (४) (दोन) व कलम ४ (५) मधील तरतुदीनुसार निर्गमित करण्यात येत आहेत.

६. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०३०५१६५५२७३९२१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Ravindra Pralhad Ate

Digitally signed by Ravindra Pralhad Ate
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=School Education And Sport Departrment, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=fd5fc4fce5f6732e6657dca817ae6ee619a55d170d3c93eff53c3ca69d1a772d, serialNumber=eaa37af2edb5809b000f33d26328f6cdac80ee32afdac3f68b5821d14e41dffa, cn=Ravindra Pralhad Ate
Date: 2018.03.05 16:57:26 +05'30'

(र.प्र. आटे)
सह सचिव,महाराष्ट्र शासन

प्रत,

१. आयुक्त, (शिक्षण),महाराष्ट्र राज्य,पुणे
२. संचालक,महाराष्ट्र विद्या प्राधिकरण, पुणे
३. सर्व शिक्षण संचालक.
४. विभागीय अध्यक्ष, म.रा.मा.व.उ.मा.शि.मडळ, नागपूर.
५. प्राचार्य, प्रादेशिक विद्या प्राधिकरण, नागपूर.
६. शिक्षण उपसंचालक, नागपूर विभाग, नागपूर
७. जिल्हा कोषागार अधिकारी,नागपूर.
८. संबंधित अधिकारी (शिक्षण आयुक्तालया मार्फत)

प्रत,(माहितीस्तव)

१. मा.मंत्री, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग यांचे विशेष कार्य अधिकारी
२. प्रधान सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग यांचे स्वीय सहायक
३. निवडनस्ती,प्रशा-२